**रयत शिक्षण संस्थेचे,**

**सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर.**

# सूचना (प्रवेश)

**दि.२६/११/२०२१**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील एफ.वाय./एस.वाय.बी.कॉम.व एफ.वाय./एस.वाय.बीबीए (सीए)/ (२०१३ व २०१९पॅटर्न) या वर्गातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे पत्र संदर्भ क्र. पमूमं/२०२०-२१/२३३८ दि. २४ नोव्हेंबर २०२१ च्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रवेश व प्रथम सत्र परीक्षेच्या आयोजनाबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

१. एफ.वाय./एस.वाय.बी.कॉम.व एफ.वाय./एस.वाय.बीबीए (सीए) मधील ज्या विद्यार्थ्यांचा निकाल FAIL किंवा FAIL ATKT असा असेल अशा विद्यार्थ्यांना एस.वाय./ टी.वाय.बी.कॉम., एस.वाय./टी.वाय.बीबीए (सीए) या वर्गात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये तात्पुरता (Provisonal) प्रवेश देण्यात येणार आहे.

२. एफ.वाय./एस.वाय.बी.कॉम.व एफ.वाय./एस.वाय.बीबीए (सीए) मधील ज्या विद्यार्थ्यांचा निकाल FAIL किंवा FAIL ATKT असा असेल अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ऑक्टो/नोव्हे.२०२१ (Backlog) च्या सत्रात नियोजित आहे. तरी ही परीक्षा वरील प्रवेशित विद्यार्थ्यांना पास होणे बंधनकारक आहे.

३. जे विद्यार्थी सदर परीक्षेत पास होणार नाही यांचा प्रवेश नियमानुसार रद्द केला जाईल. सदर प्रवेशास विद्यापीठ नियमानुसार विद्यार्थ्यांचा कुठलाही हक्क राहणार नाही.

४. एफ.वाय./एस.वाय.बी.कॉम.व एफ.वाय./एस.वाय.बीबीए (सीए) मधील ज्या विद्यार्थ्यांना वरील पत्रानुसार एस.वाय./ टी.वाय.बी.कॉम. व एस.वाय./टी.वाय.बीबीए (सीए) या वर्गात प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी आपले प्रवेशासंदर्भात हमीपत्र प्रवेशावेळी देणे बंधनकारक राहील.

५. **वरील विद्यार्थ्यांचे प्रवेश दि. ०५ /१२/२०२१ पर्यंत घेणे बंधनकारक आहे. त्यानंतर आलेल्या विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार नाही.**

वरील सूचनांचे सर्व विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे पालन करावे.

**संपर्क**

१. एस.वाय.बी.कॉम.: प्रा. डॉ. केकाणे एम.ए.- ९०११६८७६९२

२. टी.वाय.बी.कॉम. : प्रा. डॉ. सय्यद एस.बी.- ९२७००१७८७६

३. एस.वाय./टी.वाय.बीबीए (सीए): प्रा. नाबगे ए.डी. - ९५२७९६०१९९

**सोबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पत्राची प्रत**

Kekane

महाविद्यालय परीक्षा अधिकारी

Chandraroop Dakale Jain College of Commerce Shrirampur

for प्र. प्राचार्य

सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,

श्रीरामपूर

**Savitribai Phule Pune University**
(Formerly University of Pune)
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Director,**
**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune-411007
Phone No. : 020-25621345/1341/1343
E-mail : coe@unipune.ac.in
bee@pun.unipune.ac.in

**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
गणेशखिंड, पुणे-४११००७
दूरध्वनी क्र.०२०-२५६२१३४५/१३४१/४३
Website : www.unipune.ac.in

संदर्भ : पमूमं/२०२०-२१/ 2338

दिनांक : 24 नोव्हेंबर, २०२१

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
(पुणे, नाशिक व अहमदनगर जिल्हा)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रथम सत्र परीक्षांच्या आयोजनाबाबत..**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरुन आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. कोविड-१९ प्रादुर्भावाच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अहित होऊ नये या उद्देशाने सध्या पुढील वर्गात प्रवेशासाठी अर्हता प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांना एक संधी देण्याचे विद्यापीठ अधिकार मंडळाने यापूर्वी निश्चित केलेले होते. सदर बाबीस फक्त या सत्रापुरतीच मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर विद्यार्थ्यास पुढील वर्गात तात्पुरता प्रवेश (प्रोव्हिजनल अॅडमिशन) देणेबाबत महाविद्यालयांनी कार्यवाही करावी. अशा विद्यार्थ्यांनी ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ च्या परीक्षेत त्यांच्या अनुशेषित (बॅकलॉग) विषयांची परीक्षा द्यावी. या परीक्षेत अनुशेषित विषयांसाठी परीक्षा दिल्यानंतर जर विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात प्रवेशासाठी प्रचलित पध्दतीनुसार अर्हता प्राप्त केल्यास, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१- २२ च्या व्दितीय सत्राच्या परीक्षेचे आवेदनपत्र भरताना, त्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा प्रवेश कायम झालेल्या अभ्यासक्रमाच्या प्रथम व व्दितीय सत्रांच्या परीक्षांचे आवेदनपत्र एकत्रित भरण्याची संधी दिली जाईल व या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होणार नाही.

संबंधित विद्यार्थ्यांना व संलग्नित महाविद्यालयांना या पत्राव्दारे कळविण्यात येत आहे की, अर्हताप्राप्त न झालेल्या अभ्यासक्रमांचे परीक्षा आवेदनपत्र विद्यार्थ्यांना भरता येणार नाही. त्याकरिता विद्यार्थी/संस्थांनी याबाबत मागणी करु नये. तसेच महाविद्यालयांनी असे परीक्षा आवेदनपत्र इनवर्ड करु नयेत. याबाबतीत काही चुका विद्यार्थी अथवा महाविद्यालयांकडून झाल्यास हे प्रकरण प्रमाद समितीसमोर पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. कोविड-१९ प्रादुर्भावाच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयात शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसलेल्या विषयांची निवड केलेली होती. त्यामुळे निकाल प्रक्रिया राबविताना महाविद्यालय व परीक्षा विभागास अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. विद्यार्थ्यांनी योग्य विषय निवडणे आवश्यक राहील व महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्र इनवर्ड करतांना याबाबत खातरजमा करणे आवश्यक राहील, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर फोटोछपाई करण्याची सुविधा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सुरु करणेचे नियोजित आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांचा पासपोर्ट साईज (५१ एमएम X ५१ एमएम) प्लेन व्हाईट बॅकग्राऊंडवरील असा स्वच्छ व उत्तम दर्जाचा असावा. सदर फोटो महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थ्याचा आहे याबाबत महाविद्यालयांनी खातरजमा करुन घ्यावी, त्यानंतरच हा फोटो वेबपोर्टलवर अपलोड करावा.

४. जुन्या पॅटर्नमधील २००८/२०१३ पारंपारिक अभ्यासक्रमाच्या अर्हताप्राप्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेश घेतांना २०१९ अभ्यासक्रमानुसार प्रवेश घेणे आवश्यक राहील. त्यासंबंधी समकक्षता अथवा इतर बाबींसंबंधीची माहिती संलग्नित महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावी.

कळावे,

महेश काकडे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ